सत्यमेव जयते वॉटर कप २०१९ | मूल्यांकन पध्दत

सहभागी महसुली गाव/ग्रामपंचायतींना निर्देशित घटकांतर्गत एकूण १०० गुणांपैकी पुढीलप्रमाणे गुण दिले जातील.

अनुक्रमांक	घटक	कमाल गुण
१.	सांडपाण्याचा वापर	५
२.	वृक्ष संवर्धन	५
३.	श्रमदान/मनुष्यबळाचा वापर करून बांधलेल्या मृदा आणि जलसंधारण रचना	२५
४.	यंत्राचा वापर करून बांधलेल्या मृदा आणि जलसंधारण रचना	१५
५.	एरिया ट्रीटमेंट आणि रिज (माथा) उपचारांवर योग्य भर	१०
६.	रचनांची/कामांची गुणवत्ता	१०
७.	माती तपासणी	५
८.	आगपेटी मुक्त शिवार	५
९.	पाणी बचत तंत्रज्ञान	५
१०.	वॉटर बजेट	१०
११.	अगोदरच अस्तित्वात असणाऱ्या रचनांची दुरुस्ती/नाविन्यपूर्ण उपक्रम	५
	एकूण	**१००**

ह्यापैकी प्रत्येक निकषाचे सविस्तर स्पष्टीकरण खाली दिले आहे.

१. सांडपाण्याचा वापर (५ गुण)

या सेक्शन अंतर्गत सांडपाण्याच्या वापरासाठी एकूण ५ गुण दिले जातील.

सांडपाण्याच्या वापरासाठी स्पर्धेत पुढील पर्याय आहेत.

पहिला पर्याय: शोष खड्डा

गावातील/ग्रामपंचायतीतील एकूण कुटुंबसंख्येच्या प्रमाणावर आधारित जितके शोष खड्डे बांधले, त्या टक्केवारीनुसार हे गुण दिले जातील.

मात्र शोष खड्ड्याच्या संदर्भात दोन परिस्थितींत अडचणी येऊ शकतात:

१. बारीक काळी माती असेल तर पाणी मुरत नाही.

२. काळा पाषाण हा चार-पाच फूटालाच लागत असल्यास पाणी मुरत नाही.

दोन्ही अडचणींचा परिणाम सारखाच आहे की पाणी हे मुरण्याऐवजी वर येते आणि शोष खड्ड्यामुळे जलसंधारण होत नाही, तसेच गाव स्वच्छ किंवा आरोग्यदायी होत नाही. अशा परिस्थितीत शोष खड्डे घेणे तांत्रिक दृष्ट्या चुकीचे आहे. फक्त जिथे शोष खड्डा घेणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नाही, तिथे पुढील दोन पर्याय उपलब्ध आहेत.

दुसरा पर्याय: परसबाग

सांडपाणी हे परसबागेसाठी वापरावे ज्यात उपयोगी फळझाडे किंवा भाजीपाला घेता येइल.

किंवा

तिसरा पर्याय: सार्वजनिक बाग

जिथे परसबागेसाठी घरालगत जागा उपलब्ध नाही किंवा तशी वापरण्याची इच्छा नाही, तिथे अनेक घरांचे सांडपाणी एकत्रित करून ज्या ठिकाणी हे पाणी सोडले जाते तिथे या पाण्यावर सार्वजनिक बाग उभी करावी.

या बागेत अळू, कर्दळ सारख्या वनस्पती असाव्यात ज्या या पाण्याला शुद्ध करतात. हे पाणी पूर्णपणे या बागेसाठी वापरण्यास हरकत नाही. शिल्लक असल्यास, शुद्ध झालेले पाणी पुन्हा नाल्यात किंवा ओढ्यात सोडावे.

गुण देण्याची पध्दत खालील प्रमाणे आहे. जर एका गावांतील ८०% पेक्षा जास्त कुटुंबांनी या सेक्शनमधील सूचनांनुसार सांडपाण्याचा वापर केला असेल, तर त्या गावास पूर्ण ५ गुण दिले जातील.

सांडपाण्याचा वापर करणा-या कुटुंबांची टक्केवारी	**मिळणारे गुण**
८०% पेक्षा जास्त	५
७० % पेक्षा जास्त ते ८०% पर्यंत	४
५०% पेक्षा जास्त ते ७०% पर्यंत	३
३०% पेक्षा जास्त ते ५०% पर्यंत	२
१०% किंवा त्यापेक्षा जास्त ते ३०% पर्यंत	१
१०% पेक्षा कमी	०

कृपया नोंद घ्या:

१. स्पर्धेचा कालावधी सुरू होण्याआधीच बांधलेले कार्यरत शोष खड्डे किंवा तयार केलेल्या परसबागा किंवा सार्वजनिक बागा ह्या स्पर्धेकरिता ग्राह्य धरल्या जातील.

२. शौचालयाकरिता बांधलेले खड्डे, शोष खड्डे म्हणून विचारात घेतले जाणार नाहीत.

३. सार्वजनिक शोष खड्डा ग्राह्य धरला जाणार नाही.

४. परसबाग किंवा सार्वजनिक बाग याचे आकारमान इतके असावे की ज्या सांडपाण्यावर त्या उभ्या आहेत, ते सांडपाणी नाल्यांमध्ये वा बागेच्या स्थळी जमा होऊ नये. त्यासाठी नाल्यांना योग्य उतार देऊन ते कुठे तुंबत नाहीत याची काळजी घ्यावी.

५. एका कुटुंबाच्या सांडपाण्याचा वापर हा फक्त शोष खड्डा किंवा परसबाग किंवा सार्वजनिक बाग यापैकी एका उपायासाठी ग्राह्य धरण्यात येईल. एकाहून अधिक ठिकाणी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२. वृक्ष संवर्धन (५ गुण)

परिसरात असलेल्या झाडांमुळे मातीची धूप कमी होते, पावसाचे पाणी भूगर्भात मुरण्यास सहाय्य होते आणि पाऊस वाढण्याची शक्यताही वाढते. तेव्हा पाणलोटात वृक्ष लागवड हा मृदा व जल संधारणाचा महत्वाचा व शाश्वत उपचार आहे. या दृष्टीने गावात झाडे लावून जगवणे हे महत्वाचे आहे.

पूर्ण गुण मिळण्यासाठी प्रती कुटुंब दोन रोपे लावणे अपेक्षित आहे. एकूण कुटुंबसंख्येच्या तुलनेत किती कुटुंबांनी रोपे लावून जगवलीत याकरिता पुढील तक्त्याप्रमाणे गुण देण्यात येतील. गावातील/ग्रामपंचायतीतील एकूण कुटुंब संख्येच्या प्रमाणावर आधारित जितकी रोपे लावून जगवली, त्या टक्केवारीनुसार हे गुण दिले जातील. गुण देण्याची पध्दत खालील प्रमाणे आहे.

एकूण कुटुंबांच्या प्रमाणात लावलेल्या रोपांची टक्केवारी	**मिळणारे गुण**
२००%	५
१६०% पेक्षा जास्त ते २००% पेक्षा कमी	४
१४०% पेक्षा जास्त ते १६०% पर्यंत	३
१००% पेक्षा जास्त ते १४०% पर्यंत	२
६०% किंवा त्यापेक्षा जास्त ते १००% पर्यंत	१
६०% पेक्षा कमी	०

कृपया नोंद घ्या:

१. लावलेली रोपं ही लावताना किमान एका फुटाची असावीत व त्यातून वृक्ष उभा राहील अशी असावीत.

२. रोपं कोणत्याही स्थानिक जाती प्रजातींची असल्यास ती रोपं जगण्याची अधिक शक्यता आहे व ती स्थानिक जैवसृष्टीशी अधिक सुसंगत असतील. त्यामुळे लावलेली रोपं ही फक्त स्थानिक प्रजातींचीच असावीत.

३. सलग फळबाग लागवड ग्राह्य धरली जाणार नाही.

४. रोपं नोव्हेंबर २०१८ पासून कधीही लावलेली असली तरी ग्राह्य धरण्यात येतील.

५. रोपं एक तर स्पर्धा सुरू होण्यापूर्वी थंडीच्या दिवसात लावावी किंवा पाऊस आल्यानंतर लावावीत. वेरीफिकेशन टीम जेव्हा गावात जाईल त्यावेळेस एखाद्या गावात पाऊस अजिबात पडला नसला तर ते एक फुटापेक्षा अधिक वयाचे रोप पिशवीत असले तरी ग्राह्य धरले जाईल. मात्र त्यासाठीचा खड्डा हा त्यावेळेस तयार असावा. मात्र तालुका आणि राज्य पातळीवरचे जज जेव्हा येतील, तेव्हा ती रोपं खड्ड्यात लावून जिवंत असली पाहिजेत.

६. परसबाग वा सामूहिक बागेत लावलेली झाडे या सेक्शन मध्ये ग्राह्य धरली जाणार नाहीत.

७. रोपं ही शिवारात कुठेही लावली तरी चालेल - घरासमोर किंवा शाळेत लावली तर उत्तम, कारण ती जगवण्यास अधिक सोपं होईल. मात्र ती शेतात लावली तरी ग्राह्य धरले जाईल.

३. पाणी साठवण्यासाठी किंवा गाळ अडवण्यासाठी श्रमदानाचा/मनुष्यबळाचा वापर करुन बांधलेल्या रचना/उपचार (२५ गुण)

श्रमदानाचा किंवा मनुष्यबळाचा वापर करून बांधलेल्या रचना/उपचारांना २५ गुण त्यांच्या पाणी साठवण्याच्या किंवा गाळ अडवण्याच्या क्षमतेच्या प्रमाणात दिले जातील.

कृपया नोंद घ्या:

१. या सेक्शनमध्ये स्पर्धक ग्रामपंचायतींना/महसुली गावांना केवळ त्याच रचना किंवा उपचारांसाठी गुण दिले जातील ज्या मनुष्यबळाचा किंवा श्रमदानाचा वापर करून बांधण्यात आल्या आहेत. स्पर्धक महसुली गाव/ग्रामपंचायती बाहेरील मजुरांनी केलेली कामे विचारात घेतली जाणार नाहीत.

२. वरील नियमाला एक अपवाद आहे. काही संरचनांमध्ये कुशल मजूर वापरण्याची आवश्यकता असते, जसे की सिमेंट नाला बांधामध्ये कुशल गवंडी किंवा गेबीयनमध्ये जाळीचे काम करणारे. काही गावांमध्ये असे कुशल मजूर उपलब्ध नसतात. अश्या वेळी संरचनांची गुणवत्ता योग्य राखण्याच्या दृष्टीकोनातून स्पर्धक गावांना कुशल मजूर बाहेर गावाहून बोलावण्यास मुभा आहे. अकुशल मजूर गावांमधीलच असणे आवश्यक आहे हे लक्ष्यात घ्यावे.

३. स्पर्धेच्या कालावधीत, म्हणजेच ८ एप्रिल ते २२ मे या दरम्यान बांधल्या गेलेल्या रचना किंवा उपचार हेच स्पर्धेसाठी विचारात घेतले जातील. ८ एप्रिल २०१९ पूर्वी किंवा २२ मे २०१९ नंतर झालेलं कोणतंही काम स्पर्धेत गुण देण्यासाठी विचारात घेतलं जाणार नाही. ८ एप्रिल २०१९ पूर्वी किंवा २२ मे २०१९ नंतर अर्धवट स्थितीत असलेली कामेही स्पर्धेत गुण देण्यासाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

४. पाण्याची साठवण क्षमता आणि गाळ अडवण्याची क्षमता या दोन्हींवर आधारित गुण दिले जातील. स्पर्धक गावांनी निर्माण केलेली पाणी साठवण्याची आणि गाळ अडवण्याची एकूण क्षमता स्पर्धक गावाच्या एकूण लोकसंख्येने भागली जाईल आणि त्यावरून दर माणशी क्षमता मोजली जाईल.

५. श्रमाने १०,००० घ.मी. पेक्षा कमी 'एकूण क्षमता' निर्माण करणाऱ्या स्पर्धक गावाने दर माणशी ६ घ.मी. किंवा जास्त इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण केल्यास त्यांना पूर्ण गुण, म्हणजेच २५ गुण दिले जातील. यापेक्षा कमी क्षमतेचं काम करणाऱ्या महसुली गाव/ग्रामपंचायतींना निर्माण केलेल्या साठवण क्षमतेच्या प्रमाणात गुण दिले जातील. उदा. दर माणशी ३ घ.मी. साठवण क्षमतेला १२.५ गुण दिले जातील.

६. जर एखाद्या गावाने १०,००० घ.मी. क्षमतेचा टप्पा गाठल्यास त्याला एक बोनस गुण दिला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक २,५०० घ.मी. जास्तीच्या क्षमते करीता एक बोनस गुण अधिकचा दिला जाईल.

पुढील तक्ता याबाबत अधिक स्पष्टता देईल.

गावाने श्रमदानाने तयार केलेली एकूण क्षमता	**बोनस गुण**
१०,००० घ.मी. साठा	१ बोनस गुण
१२,५०० घ.मी. साठा	२ बोनस गुण
१५,००० घ.मी. साठा	३ बोनस गुण
१७,५०० घ.मी. साठा	४ बोनस गुण
२०,००० घ.मी. साठा	५ बोनस गुण आणि अशाच पद्धतीने पुढे...

उदा. ११,००० घ.मी. काम करणाऱ्या गावाला एक बोनस गुण, तर १७,००० घ.मी. काम करणाऱ्या गावाला ३ बोनस गुण आणि १८,००० घ.मी. काम करणार्याला ४ बोनस गुण दिले जातील. मात्र या सेक्शन खाली जास्तीत जास्त गुण २५ एवढेच असतील.

गावांना आपले टार्गेट हे ऍप वर दिसेल.

७. या सेक्शनचे पूर्ण २५ गुण मिळाल्यानंतर झालेले जास्तीचे श्रमदानाचे काम हे खालील सेक्शन ४ अंतर्गत मशीनच्या कामात मोजले जाईल. अशा अतिरिक्त कामाला तीन हा गुणांक दिला जाईल. उदा. या सेक्शनखाली पूर्ण गुण मिळण्यास टार्गेट २,५०० घ.मी. एवढे आहे आणि गावाने ३,५०० घ.मी. एवढे काम केले असेल, तर अतिरिक्त १,००० घ.मी. ला तीनचा गुणांक देऊन ३,००० घ.मी. मशीनच्या कामात बेरीज केली जाईल. हे मोजणे थेट पानी फाउंडेशन ऍप आपोआप करेल.

८. वरील नियमांद्वारे लहान आणि मोठ्या स्पर्धक गावांना समान पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

९. लहान मातीचे धरण, अनघड दगडी बांधासारख्या रचना या गाळ अडवून वाहत्या पाण्याची गती कमी करण्यासाठी आहेत. रचनेच्या वरच्या स्तरापर्यंत भरलेल्या प्रवाहाच्या पाण्याच्या आकारमानाच्या प्रमाणात त्यांची गाळ अडवण्याची क्षमता सुध्दा विचारात घेतली जाईल. स्पर्धेच्या कालावधीत महसुली गाव/ग्रामपंचायतींनी निर्माण केलेली एकूण साठवण क्षमता ही सर्व रचनांच्या गाळ अडवण्याची क्षमता आणि पाण्याची साठवण क्षमता यांची बेरीज असेल.

स्पर्धेचा भाग असलेल्या प्रत्येक रचनेची/उपचाराची गाळ अडवण्याची क्षमता आणि पाण्याची साठवण क्षमता काढण्याची पद्धती खालीलप्रमाणे असेल.

१. सलग समतल चर (CCT) किंवा स्टागर्ड समतल चर (SCT)

साठवण क्षमता (घ.मी.) = खोदलेल्या खड्ड्याचं आकारमान (रिक्त खड्डा) x २
= एकूण लांबी (मी.) x सरासरी रुंदी (मी.) x रिक्त खड्ड्याची सरासरी खोली (मी.) x २

२. खोल सलग समतल चर (Deep CCT/WAT/WADT)

साठवण क्षमता (घ.मी.) = खोदलेल्या खड्ड्याचं आकारमान (रिक्त खड्डा)

= एकूण लांबी (मी.) x सरासरी रुंदी (मी.) x रिक्त खड्ड्याची सरासरी खोली (मी.)

३. कंपार्टमेंट बंडिंग, फार्म बंडिंग (FB)

साठवण क्षमता (घ.मी.) = एकूण लांबी (मी.) x बांधाची सरासरी उंची (मी.)

हे बांध पानी फाउंडेशनच्या फिल्म मध्ये दाखवल्याप्रमाणे उताराला आडवे असावेत व त्या बांधाला कान असावा. उताराच्या समांतर बांध ग्राह्य धरले जाणार नाहीत.

४. कंटूर बंडिंग (CB), ढाळीचे बांध (GB)

साठवण क्षमता (घ.मी.) = एकूण लांबी (मी.) x बांधाची सरासरी उंची (मी.) x २

५. इनलेट-आऊटलेट असलेले शेततळं

साठवण क्षमता (घ.मी.) = तळ्याचं आकारमान X २

= सरासरी लांबी (मी.) x सरासरी रुंदी (मी.) x सरासरी खोली (मी.) x २

ही मापे घेताना फक्त खोदकाम केलेला तळ्याचा भागच मोजला जाईल. तळ्याभोवती टाकलेला भराव मोजला जाणार नाही.

६. छोटा मातीचा बांध किंवा अर्दन गली प्लग (EGP)

साठवण क्षमता (घ.मी.) = पूर्ण भरलेल्या बांधातील पाण्याचं आकारमान = EGP ची एकूण लांबी (मी.) x EGP ची उंची (मी.) x पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा)* (मी.) x ०.२५

जिथे *पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा) = EGP ची उंची (मी.) x १५

प्रवाहावर जिथे ६.५% तळउतार आहे, तिथे हा बांध बांधला गेला आहे असे गृहीत धरून, १५ हा निश्चित गुण्य ठरवला गेला आहे.

७. लूज बोल्डर स्ट्रक्चर (LBS)/स्टोन गली प्लग (SGP)

साठवण क्षमता (घ.मी.) = बांध पूर्ण भरुन झाला असतानाचे पाण्याचे कमाल आकारमान
= बांधाची एकूण लांबी (मी.) x बांधाची उंची (मी.) x पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा)* (मी.) x ०.२५
जिथे *पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा) = बांधाची उंची (मी.) x १०
प्रवाहावर जिथे १०% तळउतार आहे, तिथे हा बांध बांधला गेला आहे, असे गृहीत धरून १० हा निश्चित गुण्य ठरवला गेला आहे.

८. गेबियन बंधारा

साठवण क्षमता (घ.मी.) = बंधारा पूर्ण भरुन झाला असतानाचे पाण्याचे कमाल आकारमान
= बंधाऱ्याची एकूण लांबी (मी.) x बंधाऱ्याची उंची (मी.) x पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा)* (मी.) x ०.२५

जिथे *पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा) = बंधाऱ्याची सरासरी उंची (मी.) x १५

प्रवाहावर जिथे ६.५% तळउतार आहे, तिथे हा बंधारा बांधला गेला आहे असे गृहीत धरून, १५ हा निश्चित गुण्य ठरवला गेला आहे.

९. मातीचा नाला बांध किंवा अर्दन नाला बांध (ENB)

साठवण क्षमता (घ.मी.) = पूर्ण भरलेल्या बांधातील पाण्याचं आकारमान = ENB ची एकूण लांबी (मी.) x ENB ची उंची (मी.) x पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा)* (मी.) x ०.२५
जिथे *पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा) = ENB ची उंची (मी.) x ३०
प्रवाहावर जिथे ३% तळ उतार आहे, तिथे हा बांध बांधला गेला आहे असे गृहीत धरून, ३० हा निश्चित गुण्य ठरवला गेला आहे.

१०. सिमेंट नाला बांध (CNB)

साठवण क्षमता (घ.मी.) = पूर्ण भरलेल्या बांधातील पाण्याचं आकारमान = CNB ची एकूण लांबी (मी.) x CNB ची उंची (मी.) x पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा)* (मी.) x ०.२५

जिथे *पसरलेल्या पाण्याची लांबी (फुगवटा) = CNB ची उंची (मी.) x ७०
ज्या प्रवाहावर हा बांध बांधला आहे त्याचा तळ उतार १.५% आहे असे गृहीत धरून, ७० हा निश्चित गुण्य ठरवला गेला आहे.

११. नाला खोलीकरण/पाणीसाठ्यातील गाळ काढणे

साठवण क्षमता (घ.मी.) = खोदून काढलेल्या मातीचं आकारमान (रिक्त खड्डा)
= सरासरी लांबी (मी.) x सरासरी रुंदी (मी.) x रिक्त खड्ड्याची सरासरी खोली (मी.)

पूर्ण नाल्याची नव्हे तर रुंदीकरण/खोलीकरण केल्यामुळे किंवा गाळ काढल्याने नाल्यातील पाणीसाठ्याची *वाढलेली* क्षमता मोजली जाईल.

नाला खोलीकरण-रुंदीकरण हे फक्त अशा ठिकाणी ग्राह्य धरले जाईल जिथे CNB, ENB आहे किंवा टप्पा सोडून त्या टप्प्याला व्यवस्थित दगडाचे पिचिंग केले आहे.

नाला खोलीकरण-रुंदीकरण हे फक्त पाण्याची झीरो लेवल होईपर्यंत ग्राह्य धरले जाईल - त्यापुढे नाही. झीरो लेवल म्हणजेच ते शेवटचे ठिकाण जिथे CNB, ENB वा पिचिंग केलेल्या टप्प्यामागे पाणी उभे राहील. हे ते ठिकाण आहे जिथे CNB, ENB वा पिचिंग केलेल्या टप्प्याचा माथा आणि नाल्याचा तळ समान लेवलवर आहेत.

१२. नाल्यात सोडलेल्या टप्प्याचे पिचिंग
नाला खोलीकरण करताना जर मातीचा टप्पा सोडला आहे तिथे पिचिंग करणे गरजेचे आहे. अन्यथा तो टप्पा पुरात वाहून जाईल. अशा पिचिंगला फक्त श्रमदानात गुण देण्यात येतील.
साठवण क्षमता (घ.मी.) = केलेल्या पिचिंगच्या पृष्ठ भागाचे क्षेत्रफळ (मी.) x जाडी ०.२५ (मी.)

१३. विहीर पुनर्भरण
एका विहिरीचे पुनर्भरण = ८०० घनमीटर

टीप:

१. श्रमदानाने झालेले विहीर पुनर्भरण मोजताना एक सीमा घातली आहे. विहीर पुनर्भरणाद्वारे तयार झालेले घनमीटर, हे श्रमदानाच्या एकूण टार्गेटच्या तुलनेत २५% पेक्षा जास्त असतील, तर केवळ २५% पर्यंतचे घनमीटरच श्रमदानात मोजले जाईल. त्यापेक्षा अधिक असलेले घनमीटर,

हे मशीन कामात मोजले जाईल. मात्र अशा अतिरिक्त मोजमापाला कोणताही गुणांक देण्यात येणार नाही.

उदा. श्रमदानाचे टार्गेट २,००० घनमीटर आहे. विहीर पुनर्भरण ५ झाले असता ८०० घ. मी. प्रती विहीरीनुसार एकूण घनमीटर, हे ८०० x ५ = ४,००० घ.मी. होतील. तर मूल्यांकनानुसार श्रमदानाच्या टार्गेटच्या २५% म्हणजेच फक्त ५०० घ.मी. श्रमदानात मोजले जाईल. उर्वरित ३,५०० घ.मी. मशीन कामात मोजले जाईल. त्याला कोणताही गुणांक नसेल.

२. पिण्याच्या पाण्याची अथवा सार्वजनिक विहीर याचे पुनर्भरण ग्राह्य धरले जाणार नाही.

३. विहीर पुनर्भरण करताना सर्व तांत्रिक निकष काटेकोरपणे पाळावेत, विशेषतः जागा निवडीबाबतचे निकष. याकरिता गावांनी पानी फाउंडेशन ॲप वर याबाबतची फिल्म अवश्य पाहावी.

बांधलेल्या रचनांमध्ये साठणाऱ्या पाणी/गाळ साठ्याच्या मोजमाप पद्धतींचा सारांश:

अनु. क्र.	उपचाराचा प्रकार	लांबी (मी.)	सरासरी रुंदी (मी.)	सरासरी उंची/ खोली (मी.)	निश्चित गुण्य	पाणी पसरण्याची लांबी (मी.)	पाणी/गाळ साठा सूत्र
१	२	३	४	५	६	६ x ५ = ७	८
१.	सी.सी.टी./एस.सी.टी.				२		३ x ४ x ५ x ६
२.	डीप सी.सी.टी./वॅट						३ x ४ x ५
३.	कंपार्टमेंट बंडींग/फार्म बंडींग				१		३ x ५ x ६
४.	कंटूर बंडींग/ढाळीचे बांध				२		३ x ५ x ६
५.	इनलेट-आऊटलेट शेततळे				३		३ x ४ x ५ x ६
६.	छोटे मातीचे धरण/अर्दन गली प्लग				१५		३ x ५ x ७ x ०.२५
७.	अनघड दगडी बांध/लूज बोल्डर स्ट्रक्चर				१०		३ x ५ x ७ x ०.२५
८.	गॅबियन बंधारा				१५		३ x ५ x ७ x ०.२५
९.	मातीचा बंधारा				३०		३ x ५ x ७ x ०.२५
१०.	सिमेंट बंधारा				७०		३ x ५ x ७ x ०.२५
११.	नाला रुंदीकरण, खोलीकरण/पाणीसाठ्यातील गाळ काढणे						३ x ४ x ५
१२.	नाल्यात सोडलेल्या टप्प्याचे पिचिंग				०.२५		३ x ४ x ६
१३.	विहीर पुनर्भरण						८००

४. यंत्राचा वापर करून पाणी साठवण्यासाठी/गाळ अडवण्यासाठी बांधण्यात आलेल्या रचना/उपचार (१५ गुण)

यंत्राचा वापर करून बांधण्यात आलेल्या पाणी साठवण्याची/गाळ अडवण्याची क्षमता असणाऱ्या रचना/उपचारांना १५ गुण देण्यात येतील.
कृपया नोंद घ्या:

१. यंत्र आणि हाताने केलेलं काम अशा दोन्ही बाबींच संयोजन असलेल्या कोणत्याही कामाची गणती 'यांत्रिक काम' अशीच होईल.

२. महसुली गाव/ग्रामपंचायतीने निर्माण केलेली पाणी साठवण्याची आणि गाळ अडवण्याची एकूण क्षमता स्पर्धक गावाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राने विभागली जाईल आणि प्रती हेक्टर क्षमता मोजली जाईल. प्रती हेक्टर मागे निर्माण झालेल्या साठवण क्षमतेवर गुण देण्यात येतील.

३. पूर्ण गुण म्हणजेच १५ गुण हे त्या स्पर्धक गावांना दिले जातील ज्या स्पर्धक गावाने दर हेक्टरी १०० घ.मी. इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण केली आहे. यापेक्षा कमी क्षमतेचं काम करणाऱ्या स्पर्धक गावांना त्या त्या प्रमाणात गुण दिले जातील. उदा. दर हेक्टरी ५० घ.मी. साठवण क्षमतेला ७.५ गुण दिले जातील.

४. विविध रचनांची साठवण क्षमता मोजण्याची पध्दत वरील सेक्शन ३ प्रमाणेच असेल.

५. एरिया ट्रीटमेंट आणि रिज (माथा) उपचारांवर योग्य भर (१० गुण)

'सत्यमेव जयते वॉटर कप'चा मुख्य उद्देश मृदा आणि जलसंधारण हा आहे. पण हे काम शास्त्रीय पद्धतीने झाले तरच ते परिणामकारक ठरते. यासाठी 'माथा ते पायथा' उपचार करणं गरजेचं आहे. शिवाय प्रत्येक शेतकऱ्याचे शेत एक छोटे पाणलोट आहे, जिथे मातीची धूप थांबवणे आणि पाणी साठवणे गरजेचे आहे. वरील सेक्शन ३ आणि सेक्शन ४ मधील १ ते ८ व १३ क्रमांक असलेल्या रचना आणि उपचार या नेमके हेच साध्य करण्याचा प्रयत्न करतात. ही कामे जास्तीतजास्त प्रमाणात व्हावीत, यासाठी १० गुण निर्धारित केले गेलेले आहेत. हे गुण थेट पानी फाउंडेशन ॲप आपोआप मोजेल. तरी माहितीकरीता मोजण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे.

१. सेक्शन ३ आणि सेक्शन ४ नुसार एका महसुली गाव/ग्रामपंचायतीने पूर्ण गुण मिळवण्यासाठी करावे लागणारे एकूण काम (घ.मी. मध्ये) काढणे गरजेचे आहे. त्याला T (Total) मानू. म्हणजे T ही श्रमदान आणि मशीनच्या सहाय्याने कराव्या लागणाऱ्या कामाची बेरीज असेल.

T काढण्यासाठी अगोदर आपल्याला हे निश्चित करावे लागेल की एखाद्या स्पर्धक

गावाला/ग्रामपंचायतीला पूर्ण गुण मिळवण्यासाठी श्रमदानाने केवढे काम करावे लागेल आणि मशीनने केवढे काम करावे लागेल.

२. S (Shramdaan) = सेक्शन ३ खाली पूर्ण २५ गुण (बोनस गुण गृहीत धरून) मिळवण्यासाठी महसुली गाव/ग्रामपंचायतीला श्रमदानाने करावे लागणारे काम. M (Machine Work) = सेक्शन ४ खाली पूर्ण १५ गुण मिळवण्यासाठी महसुली गाव/ग्रामपंचायतीला मशीनने करावे लागणारे काम.

३. T = S + M

४. वरील सेक्शन ३ आणि सेक्शन ४ मध्ये क्रमांक १ ते ८ व १३ च्या उपचारांसाठी एका महसुली गाव/ग्रामपंचायतीने केलेल्या कामांची बेरीज घनमीटर मध्ये केली जाते. त्याला A (Area Treatment) म्हणूया. ही कामे एरिया आणि माथ्याच्या कामात किंवा मृदासंधारणाच्या कामात मोडतात. ही कामे जास्तीत जास्त प्रमाणात व्हावीत हा या सेक्शनचा उद्‌देश्य आहे.

५. जर A हा T च्या ५०% किंवा त्याहून अधिक असेल, तर महसुली गाव/ग्रामपंचायतीला पूर्ण १० गुण दिले जातील.

६. जर A हा T च्या ५०% हून कमी असेल, तर महसुली गाव/ग्रामपंचायतीला खालील प्रमाणे गुण दिले जातील.

एरिया आणि रिज (माथा) उपचार यांच्यामुळे निर्माण झालेल्या साठ्याचे गुणोत्तर = (A / T) X १००	**गुण**
५०% आणि त्यापेक्षा जास्त	१०
४५% आणि त्यापेक्षा जास्त पण ५०% पेक्षा कमी	९
४०% आणि त्यापेक्षा जास्त पण ४५% पेक्षा कमी	८
३०% आणि त्यापेक्षा जास्त पण ४०% पेक्षा कमी	५
२०% आणि त्यापेक्षा जास्त पण ३०% पेक्षा कमी	३
२०% पेक्षा कमी	०

उदा. जर डोंगरवाडी स्पर्धक गावाची लोकसंख्या १०० आहे व त्यांचे क्षेत्रफळ १०० हेक्टर आहे:

S = सेक्शन ३ खाली पूर्ण गुण मिळवण्यासाठी श्रमदानाने करावे लागणारे काम

= महसुली गाव किंवा ग्रामपंचायतीची लोकसंख्या X ६

= १०० x ६

= ६०० घ.मी.

आणि

M = सेक्शन ४ खाली पूर्ण गुण मिळवण्यासाठी महसुली गाव/ग्रामपंचायतीला मशीनने करावे लागणारे काम

= महसुली गाव किंवा ग्रामपंचायतीचे भौगोलिक क्षेत्रफळ (हेक्टर) X १००

= १०० x १००

= १०,००० घ.मी.

T = सेक्शन ३ व ४ खाली पूर्ण गुण मिळवण्यासाठी डोंगरवाडी महसुली गाव/ग्रामपंचायतीला करावे लागणारे काम

= S + M

= ६०० + १०,०००

= १०,६०० घ.मी.

डोंगरवाडीने केलेली सेक्शन ३ आणि सेक्शन ४ अंतर्गत वरील उपचार क्र. १ ते ८ व १३ ची कामे यांचे एकूण मोजमाप म्हणजेच A हे ४,००० घ.मी. एवढे आहे. त्यामुळे सेक्शन ५ अंतर्गत त्यांचे मार्क हे पुढीलप्रमाणे असतील.

A / T = ४,००० / १०,६०० x १००

= ३७.७%

वरील तक्त्याप्रमाणे डोंगरवाडीला ५ गुण मिळतील.

समजा डोंगरवाडीने केलेली सेक्शन ३ आणि सेक्शन ४ अंतर्गत वरील उपचार क्र. १ ते ८ व १३ ची कामे यांचे एकूण मोजमाप A हे ८,००० घ.मी. एवढे आहे.

A / T = ८,००० / १०,६०० x १००

= ७५.५%

वरील तक्त्याप्रमाणे डोंगरवाडीला पूर्ण १० गुण मिळतील.

६. कामाची गुणवत्ता (१० गुण)

सर्व मृद व जल संधारणाचे उपचार/रचना, शोष खड्डे, रोपवाटिका, आगपेटी मुक्त शिवार, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि विहीर पुनर्भरण या सर्व कामांची गुणवत्ता तपासणी करून हे १० गुण दिले जातील.

हे गुण पुढील पद्धतीने दिले जातील.

१. संपूर्ण महाराष्ट्र स्तरावर जी गावं स्पर्धेत आघाडीत असतील त्यांना तसेच तालुका पातळीच्या बक्षिसासाठी तालुक्यातील आघाडीच्या गावांना हे गुण पानी फाउंडेशनने नेमलेल्या परीक्षकांमार्फत दिले जातील.

२. हे गुण खालील निकषांवर आधारित असतील:

- अ. केल्या गेलेल्या पाणलोट रचनांची/उपचारांची व इतर रचनांची जागा निवड - site-selection
- आ. रचनांची आखणी आणि मार्किंग (आवश्यक आहे तिथे हायड्रोमार्कर वापरला आहे का? कंटूर रेषेवर आवश्यक असलेले उपचार कंटूर रेषेवरच आहेत का? शेताचा बांध उताराला आडवा आहे का?)
- इ. कशा पद्धतीने उपचार तयार केले आहेत? (उपचार तांत्रिक परिमाणानुसार तयार केले आहेत का?)
- ई. आवश्यक व सुयोग्य साहित्याचा वापर, बांधकामाची प्रत, क्युरिंग, फिनिशिंग इत्यादी
- उ. देखभाल व भविष्यात दुरुस्तीची शेतकऱ्यांची वा गावाची योजना

या निकषांचा तपशील सोबत परिशिष्टामध्ये जोडला आहे.

७. माती तपासणी (५ गुण)

या सेक्शनमधील ५ गुण हे माती परीक्षणासाठी आहेत.

मातीतील सेंद्रीय कर्ब वाढवल्याने मातीची जल धारण क्षमता कमालीची वाढते. तेव्हा प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेतातील मातीच्या सेंद्रीय कर्बाचे प्रमाण माहिती असणे आणि वाढवणे गरजेचे आहे. त्यामुळे स्पर्धेदरम्यान माती नमुना तपासणी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रमाणावर ५ गुण दिले जातील.

स्पर्धक गावात एकूण खातेदारांच्या किती टक्के खातेदारांनी माती नमुना तपासणी केली यावर हे गुण आधारित असतील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

एकूण खातेदारांपैकी माती नमुना तपासणी करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण	**गुण**
५०% इतकं किंवा त्यापेक्षा जास्त	५
४०% आणि त्यापेक्षा जास्त पण ५०% पेक्षा कमी	४
३०% आणि त्यापेक्षा जास्त पण ४०% पेक्षा कमी	३
१५% आणि त्यापेक्षा जास्त पण ३०% पेक्षा कमी	२
१५% पेक्षा कमी	०

फक्त १ जानेवारी २०१८ ते २२ मे २०१९ या काळात झालेली माती नमुना तपासणी ही स्पर्धेकरिता ग्राह्य धरली जाईल.

८. आगपेटी मुक्त शिवार (५ गुण)

शेतीतील पिकांपासुन शिल्लक राहणारी धसकटे, तसेच झाडातून शिल्लक राहणारी पाने, फुले, फांद्या, इत्यादी पासून बायोमास सतत निर्माण होत असतो. असा बायोमास सातत्याने शेतात कुजवून वाढवत गेल्यास शेतातील जमिनीचे सेंद्रिय कर्ब वाढते. पण आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात हा बायोमास जाळला जातो. यामुळे जमिनीतील सेंद्रीय कर्बाचे प्रमाण खूप कमी होते व यामुळे जमिनीचा कसही कमी होत जातो व त्या मातीची जल धारण क्षमता कमी होत जाते.

निरनिराळ्या पद्धतीने बायोमास कुजवून मातीतील सेंद्रीय कर्ब वाढवता येतो. यामुळे बायोमास जाळणे बंद करणे व तो कुजवून त्यातून कंपोस्ट खत निर्माण करणे याला गुण दिले गेले आहेत. बायोमास कुजवण्यास पुढील पैकी कोणतीही पद्धत ग्राह्य धरली जाईल.

अ. शेतावरील किंवा शेताजवळील कंपोस्ट खड्डे किंवा ढीग

आ. बायो-डायनामिक खड्डे

इ. नाडेप

ई. रोटावेटर/मल्चर/फ्लेल मोवर/slasher द्वारा पिकांचे अवशेष जमिनीत मिसळणे

एकूण खातेदारांच्या प्रमाणात किती खातेदारांनी वरील पैकी कोणतीही पद्धत वापरली आहे यावर हा गुणाचा आकडा आधारित आहे. याचे सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

एकूण खातेदारांपैकी कंपोस्ट खड्डे किंवा ढीग, बायो-डायनामिक खड्डे, नाडेप, यंत्राने शेतात गाडणे असे करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण	**गुण**
५०% इतकं किंवा त्यापेक्षा जास्त	५
४०% आणि त्यापेक्षा जास्त पण ५०% पेक्षा कमी	४
३०% आणि त्यापेक्षा जास्त पण ४०% पेक्षा कमी	३
२०% आणि त्यापेक्षा जास्त पण ३०% पेक्षा कमी	२
१०% आणि त्यापेक्षा जास्त पण २०% पेक्षा कमी	१
१०% पेक्षा कमी	०

कृपया नोंद घ्या:

१. जे उकिरडे/खड्डे घरगुती कचऱ्याचे विघटन करण्यासाठी बनवले गेले आहेत, त्यांचा समावेश यात केला जाणार नाही.
२. स्पर्धेचा काळ सुरू होण्यापूर्वी केलेले कंपोस्ट खड्डे, बायो-डायनामिक उपचार किंवा नाडेप सुद्धा ग्राह्य धरण्यात येतील.
३. एक नाडेप वा बायो डायनामिक उपचार हा १० खातेदारांचे टार्गेट पूर्ण करेल. मात्र नाडेप वा बायो डायनामिक मध्ये काडी कचरा हा खरोखर कंपोस्ट होताना दिसावा. त्यात प्लास्टिक अजिबात नसावे. फक्त बांधकाम हे ग्राह्य धरले जाणार नाही. नाडेप वा बायो डायनामिक चे आकारमान हे शासकीय निकषाप्रमाणे असावे.
४. नाडेप पद्धतीने कंपोस्ट खत तयार करण्यासाठी रचनेचे आकारमान हे पुढील शासकीय निकषाप्रमाणे असावे: लांबी ३.६० मीटर, रुंदी १.५० मीटर व उंची ०.९० मीटर.
५. बायोडायनॅमिक कंपोस्टचा ढीग तयार करण्यासाठी पाच मीटर लांब व दोन मीटर रुंदीचा आयत आखून घ्या. त्या आयता मध्ये वाळलेल्या व ओल्या काडी-कचऱ्याचे थरावर थर १ ते १.५० मीटर उंचीपर्यंत असावा.

९. जल बचतीची कामे (५ गुण)

जल बचतीच्या तंत्राचा वापर केल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची बचत होते. पुढील ५ पद्धती या सेक्शन खाली ग्राह्य धरणात येतील.

अ. ठिबक
आ. तुषार
इ. बी.बी.एफ.

ई. मल्चिंग पेपर

उ. बायोमास वापरून केलेले मल्चिंग

या सेक्शनमध्ये स्पर्धक गावाला जलबचतीच्या तंत्राचा अवलंब केलेल्या लागवडी खालील जमिनीच्या क्षेत्राच्या तुलनेत साल २०१८ मध्ये रब्बी हंगामात लागवडी खालील असलेल्या एकूण जमीनीच्या टक्केवारीवर आधारित गुण दिले जातील.

सविस्तर गुणांकन पध्दत पुढील प्रमाणे आहे.

साल २०१८-१९ रब्बी हंगामात लागवडीखाली असलेल्या एकूण जमीनीच्या तुलनेत जलबचतीच्या तंत्राचा अवलंब केलेल्या क्षेत्राचा गुणोत्तर	**मिळणारे गुण**
५०% इतके किंवा त्याहून जास्त	५
३०% इतके किंवा जास्त आणि ५०% पेक्षा कमी	४
१५% इतके किंवा जास्त आणि ३०% पेक्षा कमी	३
५% इतके किंवा जास्त आणि १५% पेक्षा कमी	२
५% पेक्षा कमी	०

कृपया नोंद घ्या:

१. स्पर्धा सुरु होण्याआधीपासूनच ज्या जमिनींवर या पाणी बचतीचे तंत्र वापरात असेल, त्या जमीन क्षेत्राचाही स्पर्धेसाठी अंतर्भाव केला जाईल.

२. जर क्षेत्रावर एका पेक्षा जास्त तंत्र वापरले गेले असेल, तर प्रत्येक रचना स्वतंत्रपणे मोजली जाईल. उदा. जर १० हेक्टर जमिनीवर ठिबक सिंचन आणि मल्चिंग उपचारही केला गेला असेल, तर त्या पाण्याच्या बचत करणारे तंत्र वापरणाऱ्या जमिनीचे क्षेत्र २० हेक्टर मानले जाईल.

३. ठिबक किंवा तुषार करीता झालेले बुकिंग किंवा कॉंट्रॅक्ट/कंत्राटाचे कागद हे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

४. या सेक्शन अंतर्गत पूर्ण गुण मिळण्यास स्पर्धक गावाला किमान १० हेक्टर क्षेत्रावर जल बचतीची कामे करणे अपेक्षित आहे. जर एखाद्या स्पर्धक गावात रब्बी क्षेत्रच नाही किंवा रब्बी क्षेत्र १० हेक्टर पेक्षा कमी आहे, तरी पूर्ण गुण मिळण्यासाठी या गावाला किमान १० हेक्टर क्षेत्रावर आणि ३ गुण मिळण्यासाठी किमान ५ हेक्टर क्षेत्रावर जल बचतीची

कामे करावी लागतील. पाच हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रावर जल बचतीची कामे करणाऱ्या गावाला एकही गुण दिला जाणार नाही. उदा. एखाद्या स्पर्धक गावाचे २०१८-१९ च्या हंगामात रब्बीचे क्षेत्र २ हेक्टर एवढे आहे व ते गाव ४ हेक्टर क्षेत्रावर जल बचतीची कामे करते, अशा गावाला एकही गुण मिळणार नाही. त्याच गावाने ९ हेक्टर क्षेत्रावर काम केल्यास ३ गुण आणि १० हेक्टर क्षेत्रावर काम केल्यास पूर्ण ५ गुण मिळतील.

१०. गावाचे वॉटर बजेट (१० गुण)

हा सेक्शन उपलब्ध पाण्याच्या कार्यक्षम वापर करण्याबाबत व पाण्याचा वापर कमी करण्याच्या उपायांबाबत आहे. हा सेक्शन स्पर्धक गावात उपलब्ध असलेले पाणी आणि पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी, पशुधनासाठी, शेतीसाठी, इ. विविध कारणांसाठी पाण्याचा होणारा वापर या दोन्ही बाबींचा समतोल राखण्यासाठीच्या ग्रामस्थांच्या विशेषतः शेतकऱ्यांच्या तयारीचं मूल्यांकन करेल.

गावाचे/ग्रामपंचायतीचे वॉटर बजेट हे गाव पातळीवर स्वतः ग्रामस्थांनी तयार करायला हवं आहे, ज्यामुळे पाण्याची मागणी आणि पुरवठा या बाबी त्यांना ध्यानात येतील. वॉटर बजेट गावात अतिरिक्त पाणी आहे की पाण्याची तूट आहे हे स्पष्ट करेल.

वॉटर बजेटसाठी पुढीलप्रमाणे गुण असतील:

वॉटर बजेटसंबंधी कृती	**गुण**
गावात जलमापक यंत्र बसवणे	१
पावसाची नोंदवही (रेन रेजिस्टर)	१
सध्याचे वॉटर बजेट	२
प्रस्तावित वॉटर बजेट	२
विहीरींमधील भूजल पातळी मोजणे	२
प्रस्तावित वॉटर बजेटची अंमलबजावणीसाठी केलेले प्रयत्न	२

टीप:

जलमापक यंत्र: गावात किमान एक जलमापक यंत्र असावे. मात्र भौगोलिक दृष्ट्या मोठ्या असलेल्या गावात एकाहून अधिक जलमापक यंत्र असल्यास जास्त चांगली माहिती मिळेल. जलमापक यंत्र तांत्रिक दृष्ट्या सुयोग्य ठिकाणी बसविलेले असावे. त्याची काळजी घेण्यासाठी

आणि रोज पाऊस मोजण्यासाठी एक किंवा अनेक व्यक्तींची नेमणूक करून त्याना प्रशिक्षित केलेले असावे.

पावसाची नोंदवही (रेन रेजीस्टर): प्रत्येक गावाने एक रजिस्टर ठेवावे ज्यात पडलेल्या पावसाची रोजची नोंद आहे. अवकाळी पाउस तसेच जून महिन्यात पडलेल्या पावसाच्या नोंदी त्यात असल्या पाहिजेत. या नोंदीचा सारांश पूर्ण गाव पाहू शकेल अशा सार्वजनिक जागी प्रदर्शित केलेला असावा.

सध्याचे वॉटर बजेट: सन २०१८-१९ ची माहिती भरून तांत्रिकदृष्ट्या योग्य वॉटर बजेट सादर करण्यास २ गुण दिले जातील.

प्रस्तावित वॉटर बजेट: सन २०१९-२० साठीच्या प्रस्तावित बजेट मध्ये पाण्याची तूट कमी करण्यासाठी, पाण्याचा साठा वाढविण्यासाठी आणि पाण्याचा वापर/खर्च नियंत्रित/कमी करण्यासाठी प्रस्तावित उपाययोजनांचा समावेश असेल. यात न्युट्रल किंवा positive बजेटच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी महसुली गाव/ग्रामपंचायतीने पीक पद्धतीत सुचवलेले बदल, गावाच्या वॉटर बजेटनुसार अधिक चांगल्या जलव्यवस्थापन पद्धती यांचादेखील समावेश असणे आवश्यक आहे. पाण्याचा खर्च कमी करण्यास पीक पद्धतीत बदल किंवा अन्य बदल याबद्दल गावाने ग्रामसभेत एकत्रित बसून निर्णय घेणे अपेक्षित आहे. यातूनच पाण्याचा उपसा कमी करता येईल.

दोन्ही वॉटर बजेट सर्वांना दिसेल अशा सार्वजनिक जागी लावणे आणि त्यात हंगामी बदल केले जात राहतील यासाठीची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

विहिरींची पातळी मोजणे: पूर्ण गुण मिळण्यासाठी गावाने गावातील वेगवेगळ्या भागातील किमान १० विहिरी निवडून त्यांतील पाण्याची पातळी मे महिन्यात पावसापूर्वी तांत्रिक पद्धतीने मोजावी व ती एका रजिस्टर मध्ये नोंदवावी. हीच माहिती पानी फाउंडेशन app मध्येही भरावी. गावात १० पेक्षा कमी विहिरी असल्यास जितक्या विहिरी आहेत तेवढ्या सर्व विहिरींची पातळी मोजावी व त्यासाठी पूर्ण २ गुण देण्यात येतील.

प्रस्तावित वॉटर बजेटच्या अंमलबजावणीसाठी केलेले प्रयत्न: वॉटर बजेट बाबत गाव समाज कितपत जागरूक आहे व त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यास कितपत कटीबद्ध आहे, हे तालुका व राज्य स्तरीय जज पाहतील.

११. अस्तित्वात असलेल्या रचनांची दुरुस्ती/नाविन्यपूर्ण उपक्रम (५ गुण)

बहुतेक गावांत पाझर तलाव, सी.एन.बी., माती नाला बांध, केटी वेअर किंवा एम.आय. टँक हे पाणलोट उपचार अस्तित्वात असतात. परंतु अनेक ठिकाणी ते गळके वा नादुरुस्त असतात. नवीन उपचारांच्या तुलनेत या जुन्या उपचारांची दुरुस्ती ही कितीतरी स्वस्त असते. शिवाय हे जुने उपचार अनेक वेळेस मोक्याच्या साईट्स वर असतात. त्यामुळे हे जुने उपचार रिपेअर करणे खूपच गरजेचे तसेच फायद्याचे आहे. या उद्दिष्टाने या सेक्शनचे ५ गुण पुढील तीन उपसेक्शनमध्ये वाटले गेले आहेत.

१. अस्तित्वात असलेल्या रचनांचे सर्वेक्षण व पाहणी करून पुढील मुद्द्यांचा रिपोर्ट बनवणे:

- अ. प्रत्येक अस्तित्वात असलेल्या रचनेची संख्या
- आ. प्रत्येक अस्तित्वात असलेल्या रचनेचे मोजमाप, पाणी साठ्याचे आकारमान, सिंचन क्षेत्र क्षमता आणि लाभान्वित शेतकऱ्यांची संख्या
- इ. प्रत्येक अस्तित्वात असलेल्या रचनेची सद्यस्थिती - त्यात गळती अथवा अन्य दोष आहे का? असल्यास काय दोष आहे व दुरुस्ती करण्यासाठी उपाय योजना?
- ई. अस्तित्वात असलेल्या रचना दर्शविणारा गांव नकाशा
- उ. प्रत्येक अस्तित्वात असलेल्या रचनेचा GPS युक्त फोटो

हा रिपोर्ट पूर्ण भरल्यास १ गुण दिले जातील. हे काम स्पर्धेपूर्वीही करता येईल.

एखाद्या स्पर्धक गावात/ग्रामपंचायतीत जर वरील पैकी एकही रचना अस्तित्वात नसेल, तर त्यांनी रिपोर्ट ऐवजी १ मार्कांसाठी विहीर पुनर्भरण अथवा नाविन्यपूर्ण काम करावे. पुनर्भरण झालेल्या प्रत्येक विहिरीसाठी एक गुण दिला जाईल.

२. जुन्या रचनांची दुरुस्ती:

दुरुस्ती केलेल्या रचनांच्या संख्येच्या आधारे गुण दिले जातील. साठ्यातील गाळ काढणे या प्रक्रियेला दुरुस्ती म्हणून गणले जाणार नाही. बांधकामातील चुका, अपूर्ण भाग पूर्ण करणे आणि गळती थांबवणे या गोष्टी दुरुस्ती म्हणून गणल्या जातील.

दुरुस्ती केलेल्या कामाचे फोटो हे काम सुरु करण्यापूर्वी, होताना व झाल्यानंतर असे असावे. सर्व फोटो यांची हार्ड कॉपी असावी.

पुढीलप्रमाणे गुण दिले जातील:

२ किंवा जास्त रचनांची दुरुस्ती झाली, तर पूर्ण ४ गुण

जर एका रचनेची दुरुस्ती झाली, तर २ गुण

जर महसुली गाव/ग्रामपंचायतीत फक्त १ दुरुस्तीयोग्य रचना अस्तित्वात असली, तर महसुली गाव/ग्रामपंचायतीने अगोदर एक रचना दुरुस्त करावी आणि उर्वरित २ गुणांसाठी नाविन्यपूर्ण काम करावे.

जर महसुली गाव/ग्रामपंचायतीत एकही दुरुस्तीयोग्य रचना अस्तित्वात नसली, तर महसुली गाव/ग्रामपंचायतीने सर्व ४ गुणांसाठी नाविन्यपूर्ण काम करावे.

अस्तित्वात असलेल्या रचनांची दुरुस्ती	**गुण**	**नाविन्यपूर्ण कामासाठी उर्वरीत गुण**
२	४	०
१	२	२
०	०	४

३. नाविन्यपूर्ण उपक्रम:

यात विशेष गोष्ट ही की गावाने अगोदर अस्तित्वात असलेल्या रचनांची दुरुस्ती करणे बंधनकारक आहे. हा पर्याय उपलब्ध नसेल तरच गावाने या गुणांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम या सदराखाली काम करावे.

नाविन्यपूर्ण उपक्रमाला गुणात्मक मूल्यांकनाची जोड दिलेली असून परीक्षक समिती गुण देताना कामाची गरज/निवड, गावाची विशिष्ट परिस्थिती व आव्हाने असे मुद्दे लक्षात घेऊन गुण कमी व जास्त करू शकतात.